MHSN060009982026

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.७५/२०२६ मधील नि.५ वरील आदेश.</u>

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दि.प्र.सं.आदेश ३९ नियम १ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळावी म्हणून दाखल केलेला आहे.

२. वादीतर्फे वकील श्री.एस.टी.शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीची केस अशी आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ हे वादी यांचे कलम १ब मधील वर्णन केलेल्या वादी यांच्या मिळकतीमध्ये जवळ–जवळ ४ फुट अतिक्रमण करुन घराचे बांधकाम करत आहेत. तसेच वादीचे कथन असे आहे की, सदर बांधकामाकरिता प्रतिवादी यांनी कोणतीही ग्रामपंचायतीची परवानगी घेतलेली नाही. तसेच वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे दांडगाव्याने वादी यांच्या घरजागा मिळकतीमध्ये अतिक्रमन करुन बांधकाम करत आहेत. तसेच सदरचे बांधकाम हे सध्या फाऊंडेशन लेव्हलपर्यंत आले असून, जर प्रतिवादी यांनी सदरचे बांधकाम पुर्ण केलेस वादी यांच्या घराच्या जुन्या बांधकामास धोका पोहोचणार असून, वादी यांच्या पुर्वेकडील बाजूला असलेल्या हवा, उजेड, वारा घेण्याच्या हक्कास देखील कायमस्वरुपी मुकावे लागणार आहे. सदर कामी वादी यांनी अभिलेखावर काही फोटोग्राफस दाखल केलेले आहेत. सदर फोटोग्राफस्चे अवलोकन केले असता वादी यांच्या कथनाप्रमाणे वादी यांच्या घराच्या जवळपास भिंती लगतच बांधकाम सुरु केल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा कलम १ब या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम सुरु केलेले आहे. त्यामुळे सद्य परिस्थितीत सदरचे बांधकाम पुर्ण झाल्यास वादी यांच्या हक्कास बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आजरोजी वादीतर्फे वकीलांनी युक्तीवादा दरम्यान कथन केले की, सदरचे बांधकाम सध्या फाऊंडेशन लेव्हलला आले

असून प्रतिवादी हे दांडगाव्याने बांधकाम पुर्ण करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सद्य परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकत कलम १ब मध्ये करत असलेल्या बांधकामाबाबत जैसे थे परिस्थतीत ठेवणेबाबत आदेश देणे योग्य व न्यायोचीत असे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. प्रतिवादी क्र.१ व २ व तर्फे इसम यांना एकतर्फा आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या दाव्याच्या कामी हजर होवून म्हणणे दाखल करेपर्यंत दावा कलम १ब मिळकतीतील बांधकामाबाबत जैसे थे परिस्थिती ठेवावी.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांना कारणे दाखवा नोटीस काढणेत यावा.

३. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३(अ) प्रमाणे पुर्तता करावी.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2026.03.07 17:48:12 +0530

मिरज. **(श्री. ए. एस. राणे)**

दि.०७.०३.२०२६ प्र. दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.